ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal
Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

# स्त्री आणि साहित्य : नोंदी आणि निरीक्षणे

8 मार्च 2022

प्रचंड वादाच्या
भोवऱ्यात
अडकत राहिली
ती ..........
गटांगळ्या
खाणाऱ्या
मनोवस्थेतून
किलकिलत्या डोळ्यांनी,
सावध होऊन
भेदक नजरेने
आजूबाजूचा
वेध घेत
सावकाशपणे
धरतीवर
स्थिर होऊ पाहणारी,
ती ..........
असंख्य संकटातून संघर्षाने
तग धरून
दीर्घ श्वासानंतर
अचानक झेपावते
व क्षणात
आकाशाला कवेत घेते.

प्रा. डॉ. भारती रेवडकर
विशेषांक संपादक

Scanned by CamScanner

ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal
Impact Factor : 4.58 (CIF)

129/498, Vasant Vihar, Near Old Pune Naka, Solapur-413001 (Maharashtra, India)
E-mail: researchspectrum@gmail.com / Cell: 09637335551, 07020828552

# स्त्री आणि साहित्य : नोंदी आणि निरीक्षणे

8th March, 2022

प्रचंड वादाच्या
भोवऱ्यात
अडकत राहिली
ती ..........
गटांगळ्या
खाणाऱ्या
मनोवस्थेतून
किलकिलत्या डोळ्यांनी,
सावध होऊन
भेदक नजरेने
आजूबाजूचा
वेध घेत
सावकाशपणे
धरतीवर
स्थिर होऊ पाहणारी,
ती ..........
असंख्य संकटातून संघर्षाने
तग धरून
दीर्घ श्वासानंतर
अचानक झेपावते
व क्षणात
आकाशाला कवेत घेते.

संपादक
प्रा. डॉ. भारती रेवडकर
प्रा. प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी
९६०४५१५५२३

Scanned by CamScanner

## CONTENTS


| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | बिजापूर डायरी आणि आदिवासी स्त्री : एक चिकित्सा<br>प्रा. डॉ. भारती रेवडकर | 01 |
| 2 | रेव्हरंड ना.वा. टिळकांची स्त्रीविषयक भूमिका<br>प्रा. डॉ. पौर्णिमा कोल्हे | 05 |
| 3 | शुद्ध, सात्त्विक प्रेमाचे मूर्तरूप : सावित्री<br>डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. सचिन रुपनर | 10 |
| 4 | गोंडवानातील महान वीरांगनांच्या कार्यकर्तृत्वाचा दस्तावेज<br>प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित | 15 |
| 5 | स्त्रियांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी कादंबरी – 'रीटा वेलिणकर'<br>डॉ. वर्षा वि. देसाई–रुपनर | 21 |
| 6 | दास्यशृंखला व जातवास्तवाचे क्रांतिपर्व : मुक्ता साळवे<br>प्रा. डॉ. बाळासाहेब दास | 26 |
| 7 | स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरुप : एक मागोवा<br>प्रा. डॉ. विशाल प्र. लिंगायत | 30 |
| 8 | दलित कवितेतील स्त्री रुप आणि स्वरुप<br>प्रा. डॉ. बिरा पारसे | 33 |
| 9 | नव्वदोत्तर मराठी कथेतील स्त्रीवाद<br>प्रा. डॉ. रविकांत शिंदे | 40 |
| 10 | २००० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण<br>प्रा. डॉ. शारदा वामन मोरे | 46 |
| 11 | प्राचीन काळ व स्त्रियांचे अधिकार<br>प्रा. विजया द. जगताप | 51 |
| 12 | कोविड – १९ चा बार्शी शहरातील घरकाम करणाऱ्या महिला कामगारांवर झालेल्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ. प्रा. शोभा विष्णुपंत खंदारे | 53 |
| 13 | स्त्रीवाद : संकल्पना आणि सिध्दांकन<br>प्रा. शुभदा उपासे–शिवपूजे | 59 |
| 14 | 'अश्रूची फुले' काव्यसंग्रहातील स्त्री जीवन'<br>संतोष लोंढे | 63 |
| 15 | स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्री चित्रण : मेघना पेठे यांच्या कथा<br>शोभा हणमंतराव मिसाळ | 70 |
| 16 | प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्रीवाद<br>कु महानंदा शिवशरण बनसोडे | 73 |
| 17 | जयंत नारळीकर लिखित ''चार नगरातले माझे विश्व'' आत्मचरित्रातील स्त्री चित्रण<br>मंदा सुभाष हाडवळे | 76 |




Scanned by CamScanner

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# शुद्ध, सात्त्विक प्रेमाचे मूर्तरूप : सावित्री

**डॉ. पांडुरंग भोसले**
एस. एम. जोशी कॉलेज हडपसर, पुणे
**डॉ. सचिन रूपनर**
पुणे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात अनेक स्थित्यंतरे झाली समाजात अनेक प्रकारची परिवर्तने झाली. ही परिवर्तने सामाजिक राजकीय, आर्थिकतेबरोबरच मानसिक आणि वैचारिक अशा सर्वच स्तरावरील होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा भारतीय नागरिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय नागरिक यांच्यामध्ये अंतर्बाह्य परिवर्तन झालेले दिसून येते. याचेच प्रतिबिंब आपणास नवसाहित्यात प्रकर्षाने जाणवते. स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्य आदि-मध्य-शेवट या फड्के-खांडेकर-माडखोलकर तंत्रात अडकून पडले होते, मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात साहित्याने ही बंधने झुगारुन दिली आणि स्वत:चा स्वतंत्र मार्ग शोधायला सुरुवात केली. त्याचाच परिणाम म्हणून मराठी वाङ्मयात विविध प्रवाह निर्माण झाले आणि या प्रवाहांनी मराठी साहित्यावर स्वत:चा प्रभाव पाहून स्वतंत्र संसार थाटला, आपले अस्तित्व निर्माण केले. त्याचबरोबर या काळातील लेखकांनी साहित्यनिर्मिती करीत असताना काही जाणिवपूर्वक नवनवे प्रयोग केले. वेगळ्या विषयांना स्थान दिले. वेगवेगळ्या तंत्राचा अवलंब केला. मग त्यात कुणी रोजनिशीच्या स्वरुपात कादंबरी लेखनाचा प्रयत्न केला, काहींना आत्मनिवेदनाचा अवलंब करुन कादंबरी लिहिली. काही ठिकाणी डायरीच्या स्वरुपातील लेखन आढळते, काही कादंबऱ्यांमध्ये कादंबरी अधिक परिणामकारक व्हावी म्हणून पत्रांचा वापर केलेला आहे, तर काही कादंबऱ्यांचे स्वरुपच पत्रात्मक आहे. असे इतरही काही नवनवे प्रयोग तंत्रांच्या बाबतीत झाले. असे प्रयोग १९६० नंतर अनेक लेखकांनी केले. असा नवा प्रयोग पु.शि. रेगे यांच्या सावित्री कादंबरीत केलेला आहे.

'सावित्री' ही पु.शि. रेगे यांची कादंबरी १९६२ मध्ये प्रकाशित झाली. ही कादंबरी पत्रात्मक स्वरुपाची आहे. एक कवी म्हणून प्रसिध्द असणाऱ्या रेग्यांची ही कादंबरीही तेवढीच काव्यात्म निर्माण झाली आहे. काव्यप्रांतात आपल्या प्रतिभेने एक वेगळीच ओळख निर्माण करणाऱ्या रेग्यांनी ही कादंबरीही तेवढीच काव्यात्मक अशी लिहिली आहे. या कादंबरीत येणाऱ्या ३९ पत्रांमधून त्यांनी सावित्री उर्फ साऊची उत्कट, निर्मळ व सात्त्विक प्रेमकहाणी मांडली आहे. या पत्रातील आशयांच्या सहाय्याने त्यांनी साऊच्या जीवनातील वेगवेगळ्या घटना प्रसंगांचा परिचय करुन दिला आहे.

'सावित्री' कादंबरी म्हणजे सावित्रीने आपल्या प्रियकराला लिहिलेली पत्र आहेत. साऊ ही या कादंबरीची नायिका असून संपूर्ण कादंबरीभर तिचे अस्तित्व जाणवते. सर्व कादंबरीभर साऊच विखुरलेली आहे. 'सावित्री' कादंबरीतील सर्वच पत्रे ही या सावित्रीच्या प्रेमाने ओतप्रोत भरलेली आहेत. या सावित्रीच्या प्रेमाचे स्वरुप आजच्या प्रेमापेक्षा वेगळे आहे. तिचे आपल्या प्रियकरावर निरतिशय प्रेम असून तिचे हे प्रेम शुद्ध सात्त्विक स्वरुपाचे आहे. त्यात भोगापेक्षा त्यागाला अधिक महत्त्व आहे. साऊचे प्रेम हे मागण्यापेक्षा देण्याला, आत्मसमर्पणाला जागणारे आहे. आज आपण समाजात सर्वत्र ज्याप्रकारचे बरबटलेले, भोगवादी, वासनामय प्रेमाची, शारीरिक ओढ असणाऱ्या प्रेमाची अनुभूती घेताहोत त्या स्वरुपाचे सावित्रीचे प्रेम नाही, तिचे प्रेम हे कृष्णाच्या राधेसारखे आहे. निखळ, सोज्वळ आहे.

सावित्री म्हणजे आईविना लहानाची मोठी झालेली तरुणी आहे. जिचा सांभाळ तिचे वडील अतिशय काळजीपूर्वक करतात. तिच्यावर ते आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे चांगले संस्कार करतात. तेच तिचे सर्वस्व आहेत. त्यांना ती आप्पा म्हणते. आप्पा तिला तिच्या स्वभावगुणांवरुन, वागण्यावरुन 'आनंदभाविनी' असे संबोधतात. अशी ही सावित्री सर्वांना आनंद वाटणारी, सुख



Scanned by CamScanner

देणारी, सर्वांशी नम्रतेने वागणारी, अतिशय समजुतदार अशी मुलगी आहे. ती म्हणते, 'मोर हवा असेल तर आपणच मोर व्हायचं,' अशी ती आत्मसमर्पण करणारी आहे. त्याचबरोबर ती हुशार व विचारशीलही आहे.

या सावित्रीचे तिच्यापेक्षा कॉलेजमध्ये सिनिअर असणाऱ्या विद्यार्थ्यावर प्रेम आहे. तो तिला घरी भेटायला येणार असे समजताच ती खूप आनंदी होते. त्याच्या भेटीसाठी ती खास बेत आखते. ती त्याला लिहिलेल्या पत्रात लिहिते, "मी फिकट जांभळ्या रंगाची माझी आवडती साडी नेसून येईन. हातात तुमच्या सत्कारासाठी दोन वेचक फुलं असतील. तुम्ही मला पाहिल्यावर तुमच्या हातातली काठी वर करा."

"आपण तिरुपेटहून एकदम घरी नाही जायचं. बगीनं प्रथम इथूनच जवळ कन्नीरचं तळं आहे. तळ्यापाशी होयसळांच्या वेळचं एक जुनं देऊळ आहे. तिथंच जेवण करू आणि मग घरी येऊ." (सावित्री पृ. १७-१८) असा आपला बेत कळविते. पण त्याचं येणं रद्द झाल्यावर खूप दुःखी होते. मात्र यानंतर थोड्याच दिवसांनी तो परत तिच्या घरी येऊन तिला भेटून पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जातो. त्याच्या जाण्यानंतर साऊही आपले वडील आप्पांबरोबर जपानला जाते. तेथील असणाऱ्या आनंदनिकेतनमध्ये चांगलीच रममाण होते. जपानमध्येही आपल्या आनंदी स्वभावामुळे अनेक मित्र-मैत्रिणी बनवते. आप्पांशी, आप्पांचे असणारे स्नेही एजवर्थ यांच्याशी ती तात्त्विक चर्चा करते. आपली जीवलग मैत्रीण ल्योरोच्या मदतीने 'हसरं झाड' या शीर्षकाचे नाटक बसवते. तिचा जपानमधला वेळ अत्यंत आनंदात व्यतित होत असतो. तसेच आप्पांचीही व्याख्याने सुरु असतात. त्याच्याबरोबरीने ते Experience and Growth या पुस्तकाचे लेखनही जोमाने करत असतात.

परंतु याच दरम्यान पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी आजारपणात आप्पांचे देहावसन होते. त्यानंतर साऊ जपानमध्येच राहून आझाद हिंद सेनेत परिचारिका म्हणून काम करते. तेथे तिचा मेजर अग्निहोत्री व यांच्या पत्नीशी परिचय होऊन सलोखा निर्माण होतो. पण थोड्याच अवधित ते दोघेही मृत्यू पावतात. तेव्हा सावित्री त्यांच्या नुकत्याच जन्मलेल्या बीनास दत्तक घेऊन भारतात परतते व काही दिवसांसाठी आपल्या प्रियकरालाही भारतात बोलावून घेते.

अशी ही उत्कट प्रेमकथा सावित्रीच्या पत्रातून अनुभवास येते. अशाप्रकारे रेगे या कादंबरीतून पत्रात्मक घाटाचा वापर करुन थोडक्या अवकाशात मोठा आशय व्यक्त करतात. या कादंबरीबाबत नरहर कुरुंदकर म्हणतात, "सगळे व्यक्तिमत्त्व, व्यक्तिदर्शन, गुंतागुंतीचे कथानक, मनोविकास, व्यंजनेच्या आधारे सूचित केले जाऊ शकतात ही भाषेच्या पोटात दडलेली सूक्ष्मतेची शक्यता रेगे यांनी मराठीत सर्वप्रथम ओळखली व सावित्रीत हा पत्रात्मक कादंबरीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला"[1] अशाप्रकारे पत्रात्मक निवेदनातून रेगेंनी सावित्रीचा जीवनपट, तिच्या सुख-दुःखाचे क्षण, स्वभावदर्शन घडून एक सात्त्विक, शुद्ध प्रेमकहाणी वाचकांना अनुभवावयास दिली.

'सावित्री' कादंबरीतील समाविष्ट असणारी सर्वच्या सर्व पात्रे ही साऊ म्हणजेच सावित्रीचीच आहेत. सावित्री ही या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. या कादंबरीतील साऊ उर्फ आनंदभाविनी ही एक निखळ, निरागस मुलगी आहे. अशा या कॉलेजच्या तरुणीला विणावादनाचा छंद आहे. लहानपणीच मातृछत्र हरवलेली साऊ अतिशय जबाबदार व कर्तव्यनिष्ठ आहे. आप्पांच्या छात्रछायेखाली वाढलेली साऊ अतिशय सुसंस्कारी आहे. संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला जीव लावून आपलेसे करणारी मायाळू साऊ आहे. तिचे आपल्या वडिलांवरही निरातिशय प्रेम आहे. त्या प्रेमापोटीच ती त्यांची देखभाल करण्यासाठी त्यांच्याबरोबर जपानला जाते. आप्पांनी दिलेल्या नावाप्रमाणेच ती आनंद विखुरणारी आनंदभाविनी आहे.

ही साऊ फक्त खेळकर मनमिळाऊ आहे असे नाही तर ती समजुतदार व विचारीही आहे. एकदा लहानपणी केलेल्या तिच्या हट्टाचा सर्वांनाच त्रास झाला म्हणून पुन्हा तिने कधी हट्ट केला नाही. "जे जे हवं ते ते आपणच व्हायचं," अशा विचारानेच ती वागली. जे जे आपल्याकडे आहे त्यातच ती आनंद मानू लागली. जे नाही त्याची खंत करणे ती सोडून देते.



Scanned by CamScanner

अशा या सावित्रीचे एका तरुणावर प्रेम आहे. पण या प्रेमाच स्वरुपही आदर्श असेच आहे. हा तरुणही सावित्रीएवढाच जबाबदार आहे. तो हुशार, ध्येयवादी, बुद्धिमान आहे. त्याचेही साऊवर नितांत प्रेम आहे. पण दोघांच्याही प्रेमात ध्येय महत्त्वाचे आहे. दोघेही आपल्या ध्येयामध्ये प्रेमाला अडथळा बनू देत नाहीत. म्हणून तर तो साऊवर प्रेम असूनदेखील पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जातो. त्याचेही साऊवर जीवापाड प्रेम आहे. म्हणून बरीच वर्षे परदेशात राहूनदेखील तो अविवाहित राहतो. अशा ध्येयवादी व एकनिष्ठ तरुणावर ती प्रेम करते, त्यांच्या प्रेमातही प्रौढपणा, प्रगल्भता जाणवते.

खेळकर, विचारशील असणारी साऊ समजूतदारही आहे. तिचा प्रियकर जेव्हा तिला भेटण्यासाठी तिच्या घरी येणार असतो तेव्हा ती खूप खूप आनंदी होते. त्याच भावनेच्या भरात ती आपल्या पुढील काही दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन ठरवून ठेवते. पण त्याचे येणे अचानक रद्द होते. त्यावेळेस ती दुःखी होते पण चीडत नाही, रागावत नाही, तर ती फक्त म्हणते -"फारं पुढं पाहू नये आणि मागचं पुन्हा रंगवू नये." (पृ. २४) अशी नवी शिकवण घेऊन ती स्वतःची समजूत काढते. "प्रेम, प्रीती, अनुराग इ. गोष्टी तिला अपूर्वास वाटत नाही तर स्वतःला कुठेतरी स्थिर करण्यासाठी आपणही केवळ निशाण म्हणून वापरते" (पृ. ३८) असं ती मानते.

आपल्या वाट्याला आलेला प्रत्येक अनुभव ती आपल्या प्रियकराशी वाटून घेते. 'आनंद मिशन' च्या समारंभासाठी 'गाणारं झाड' नावाचे नाटक बसवते. या नाटकातून आधुनिकीकरणाचा, यांत्रिकीकरणावर व त्यातून उद्भवणाऱ्या पर्यावरणविषयक समस्यांवर प्रकाश टाकते. निसर्गाचा होणारा नाश व त्यातून निर्माण होणारी भयावह समस्या ती अधोरेखित करते. त्यातून तिच्यातील दुरदृष्टी प्रयत्यास येते. एवढेच नव्हे तर आप्पांच्या निधनानंतर ओसाकाच्या मिलिटरी हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करते. आप्पांच्या प्रकाशनाचे काम त्यांच्यानंतर ती स्वतः करते आणि त्यांचे 'Experience and Growth' हे पुस्तक ती प्रकाशित करते.

अशी ही "पु. शि. रेग्यांची सावित्री वाचकांच्या मनाला विचार करण्याचीच सवय लावून जाते. आपल्याला मोर हवा असेल तर आपणच मोर व्हायचं, हे तिचे शहाणपण, फुले गुंफताना कोमेजलेल्या फुलांनाही तिने हारात सावरुन घेतलेले असते' ही तिची व्याकुळता अंतर्मुखता विश्लेषणाने काहीच साधत नाही. आपण आपल्यालाच पारखे होतो, ही तिची वेदना हे सगळे रंग एका स्त्रीमनाला हळुवारपणे उलगडत जातात."[२]

सावित्री स्वतःच्या स्वभावाने निर्माण केलेल्या, जोपासलेल्या नात्यात आपल्या प्रेमाचा अडसर बनू देत नाही. म्हणूनच ती ल्योरो भेटायला आल्यावर इंग्लंडहून येणाऱ्या प्रियकराला थांबवते. सुखाविषयीचे तिचे विचार अलौकिक आहेत. ती म्हणते, "दुःखाच्या पलिकडचं जसं एक दुःख असतं. तसं सुखाच्याही पलिकडे एक सुख असतं. दुःखाच्या पलिकडच्या सुखानं दुःखाचा परिहार होण्याची शक्यता असते. सुखाच्या पलिकडच्या सुखात सुख आणि दुःख दोन्ही सामावून घेतलेली असतात." (पृ. ७६) यावरुनच तिचे सुख दुःखाबद्दलचे विचार समजतात.

आईविना वाढलेली साऊ सर्व स्तरावर सर्व नातेसंबंध यशस्वीपणे सांभळते. ती आपल्या वडिलांची अतिशय काळजी घेते. ती त्यांच्या सेवाशुश्रूतेमध्ये कोणतीही कसुर सोडत नाही. तिचे सर्व वर्तन वडिलांच्या मर्जिप्रमाणे आहे. आईविना वाढलेली असली तरी ती न्रम, विनयशील आहे. दुसऱ्या शहरात राहून शिक्षण घेतलेली साऊ आपल्या मर्यादांचे उल्लंघन करत नाही. सर्वसामान्य घरात जन्मलेली साऊ सर्वसामान्य आहे. सर्वांशी ती आपुलकीने, स्नेहाने वागण सर्वांना ती आपलेसे करून घेते.

पु. शि. रेगेंची ही सावित्री आधुनिक काळात वावरत असली, शिक्षणाने आधुनिक झाली असली तरी ती आपल्या पूर्वसंस्कारावर आधारित जीवन जगणारी, परंपरा मानणारी व विशिष्ट मर्यादेत राहून वर्तन करणारी एक आदर्श तरुणी आहे. तिला आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा अहंकार नाही. ती आप्पा, प्रो. जोशी, नामुरा यांच्याशी तात्विक चर्चा करण्याएवढी बुद्धिमान आहे. तिचे स्वतःचे असे स्वतंत्र विचार आहेत. स्वतंत्र अशी वैचारिक बैठक असणारी ही साऊ आहे, म्हणून तर ती कोणत्याही भावनेच्या आहारी



Scanned by CamScanner

जात नाही. आप्पांच्या मृत्यूनंतर ती त्यांच्या पुस्तक प्रकाशनाचे कार्य पूर्ण करते. बीनाला दत्तक घेते. आपल्या प्रियकराच्या ध्येयप्राप्तीत ती त्याला साथ देते. प्रेमात कोणत्याही मर्यादेचं उल्लंघन न करता लक्ष्मण रेषेत राहूनच ती प्रेमही करते. या सर्वच गोष्टींवरुन सावित्रीच्या प्रगल्भतेचा, तिच्या विवेकशील वृत्तीचा प्रत्यय येतो.

अशी ही परंपरेच्या अधिन राहून जीवन जगणारी सावित्री पत्रातून भेटते जी वाचकांच्या मनावर रेंगाळत राहते. अनेक सावल्यांमध्ये विसावून सर्वांमध्ये, समजुतींमध्ये सामावून जाते. या सावित्रीच्या माध्यमातून येथे रेगे यांच्या अनेकस्तरीय लेखनाचा पुन:प्रत्यय येतो. उघडपणे प्रेमही व्यक्त न करण्याच्या या काळात सावित्रीची लिहिलेली ही पत्रे व त्यातून व्यक्त होणारे प्रेम हे सर्वच अनोखे आहे. येथे जे सांगायचे ते स्पष्टपणे न सांगता ते सूचित करण्यावर भर दिला जातो ते सांगताना केवळ कथानक येत नाही तर त्या सांगण्याचा पूर्ण परिसरच जिवंत होऊन उतरविला जातो. या कादंबरीतून येणारी सर्वच्या सर्व पत्रे म्हणजे सावित्रीच्या मनोभावांचा एक तुकडा आहे. त्यात कृत्रिमता नाही. कोणतेही उपचार नाहीत. जे घडते, अनुभवायला मिळते ते अगदी सहजसुलभ आहे. नैसर्गिक वाटावे इतके निर्मळ आहे. जे घडते ते अगदी सावित्रीच्या आतले आहे, वरवरचे काही नाहीच.

अशी ही अवघी एकोणचाळीस पत्रे असलेली ही पत्ररुप कादंबरी. आकार छोटा, पण अवकाश मोठा असणारी ही अल्पाक्षरमणीय कादंबरी म्हणजे एक लयबद्ध तरल कादंबरी आहे. ही कादंबरी वाचताना एक सुरस गीतच अनुभवल्याचा अनुभव येतो. वडिलांच्या पितृछायेखाली वाढलेल्या, परंपरेचे पालन करणाऱ्या, तरुण बुद्धिमान मुलीच्या विचाविश्वाचा, भावभावनांचा पक्ष मांडणारी ही प्रेमकथा आहे. सुरुवातीला मुग्ध करणारी आणि नंतर परिपक्व होत जाणाऱ्या तिच्या प्रेमाचा प्रवास सांगणारी एक एक आदर्शत्वाचा नमुना असणारी कहाणी आहे. ही कादंबरी म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेणाऱ्या, सर्वच मर्यादांचे पालन करणाऱ्या, स्वतंत्र विचारांच्या, संवेदनशील, कलात्मक, तात्त्विक विचारांची बैठक असणाऱ्या, तरीही कसलाही अहंकार, गर्व नसणाऱ्या प्रेम संकल्पनेला अतिशय व्यापक स्वरुपात पाहणाऱ्या एक सोज्वळ, निरागस युवतीच्या सोज्वळ व सात्त्विक प्रेमाचे प्रतीक आहे. यातील सावित्री ही आनंदी आहे, खेळकर आहे, विचारी असूनही तीक्ष्ण विनोदबुद्धी असणारी आहे.

आजपर्यंत मराठी कादंबरी वाङ्मयात अनेक लेखक-लेखिकांनी वेगवेगळ्या नायिका आपापल्या लेखनसामर्थ्याने रेखाटल्या आहेत, परंतु पु.शि. रेगे यांनी जी सावित्री जिवंतपणे चित्रित केली आहे, तिची जातकुळीच वेगळी आहे. अतिशय सर्वगुणसंपन्न अशी ही नायिका रेखाटली आहे. जी आपल्या प्रियकराला त्याच्या ध्येयापर्यंत जाण्यात अडसर ठरत नाही. आपला प्रियकर परदेशात एकटा राहू नये म्हणून ती आपल्या प्रेमाचा त्याग करुन आपल्या जीवलग मैत्रीण ल्योरोला त्याच्या स्वाधीन करुन सांगते, "ल्योरो म्हणजे मीच व मीच म्हणजे ल्योरो समजा" एवढं साऊचं प्रेम आहे. तिच्या सुखाबद्दलच्या, प्रेमाबद्दलच्या संकल्पनाच वेगळ्या आहेत. सर्व गोष्टीत ती आनंद माननारी आहे. म्हणून ती कोणत्याही प्रसंगात स्थिर असते, आनंदी असते.

आपल्या एका पत्रात साऊ म्हणते, 'मला फक्त एकच ठाऊक आहे स्वत:ला विसरणं समर्पण - अशी ही साऊ समर्पण भावनेने आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकावर स्वत:ला विसरुन प्रेम करते. मग ते आप्पा असोत, प्रो. जोशी, एजवर्थ असो, नामुरा असो किंवा दत्तक घेतलेली बीना असतो अशा सर्वांवरच ती उत्कट प्रेम करते. म्हणूनच तर जे-जे लोक सावित्रीला आवडतात ते सर्वचजण तिच्यामध्ये विरघळून जातात, तिचेच होतात. तिची ३९ पत्रे म्हणजे तिचा एक प्रगल्भ असा वैशिष्ट्यपूर्ण असा एक जीवनप्रवासच आहे.

पुराणकाळातील सावित्रीच्या कथेतील सावित्री आपल्या पतीचे प्राण यमाकडून परत मिळविते. ती सावित्री जेवढी श्रेष्ठ तेवढीच ही सावित्रीदेखील श्रेष्ठ वाटते. कारण विवाह बंधनात न अडकलेल्या तरुण, विद्वान असणाऱ्या व परदेशी प्रियकराला ती आपल्या पवित्र प्रेमाच्या बळावर परत अविवाहित असाच मायदेशी परत आणते. त्याचेही तिच्यावर तीव्र प्रेम असल्याचे जाणवते. ही सर्व सावित्रीच्याच प्रेमाची किमया आहे. परदेशात गेलेला तरुण तेथील प्रलोभनांना, तेथील सोयी-सुविधांना, तेथील आधुनिक वातावरणाला बळी न पडता अविवाहित स्वदेशी परतणे सर्वसाधारण गोष्ट नाही. म्हणून ही सावित्री पुराणातील सावित्रीएवढीच मोठी



Scanned by CamScanner

वाटते. "सावित्रीच्या रुपाने रेग्यांनी कादंबरी लेखनातला एक प्रयोग केला आणि तो मान्यताही पावला. आठवर्णीच्या कालावधीत सावित्रीने लिहिलेली एकूण एकोणचाळीस पत्रे म्हणजे ही कादंबरी. त्यातून प्रत्यक्ष सांगितले जाते त्यापेक्षा सुचवले अधिक जाते"[३] हा या कादंबरी बाबतचा अविनाश सप्रे यांचा अभिप्राय रास्तच वाटतो.

**समारोप :**

आनंदभाविनी म्हणून उल्लेख येणारी ही सावित्री आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाकडून काहीना काही तरी स्वीकारते व स्वतःपरिपूर्ण होते. तिच्याकडे असणारे ज्ञान संस्कार हे तिने आप्पा व एजवर्थ यांच्याकडून घेतले आहेत. मानवी नातेसंबंधांचे संस्कार राजम्माकडून घेतले आहेत. मैत्रीचे संस्कार वमुरादेवण प्रो. जोशी तिला बहुभाषिक बनवतात. ल्योरो तिला मानवी संबंध, कला, संस्कृती यांच्याकडे नवी दृष्टीने पहायला शिकवते. अशा या व्यक्तिकडून शिकून घेणारी साऊ जीवनात प्रगल्भ होऊ पहाते आहे. म्हणून ती संस्कारांनी संस्कारित असणाऱ्यांकडून संस्कारित झालेली आहे. त्यातूनच तिची कला, ज्ञान, प्रेम, बुद्धी या सर्व दिशांनी समृद्ध अशी वाटचाल झालेली आहे.

एकूणच काय पु. शि. रेगे यांची ही सावित्री पत्रात्मक लघु कादंबरी अभिजात अशी आहे. ही कादंबरी वाचताना आपण कोणतेतरी गीत वाचत आहोत असा अनुभव येतो. अल्पाक्षररमणीयत्व व लयबद्धता ही या कादंबरीचे खास विशेष आहेत. ही पत्रे एका पुरुषाने लिहिली आहेत हे वाचताना कोठेही जाणवत नाही. या पत्रांमधून स्त्री मनाचे सर्व कंगोरे सूक्ष्मपणे व्यक्त करण्यास रेगे यशस्वी झाले आहेत. मनाला एक सुखद अनुभव देणारी ही लघु कादंबरी आहे. लघु असली तरी फार मोठा आशय ती व्यक्त करते. आजच्या या आधुनिक युगातही असे सावित्रीचे शुद्ध, सात्त्विक, पवित्र प्रेम अनुभवायला मिळावे असे वाटते. नव्हेती काळाची गरज वाटते.

**संदर्भ :**

१) कुरुंदकर, नरहर – धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७१, पृ. २३५

२) कुलकणी, अ.अ. (संपा.) – प्रदक्षिणा (खंड दुसरा), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१, पृ. १२०

३) आठवलेकर, मंगला – पु.भा.भावे साहित्य विचार, चेतश्री प्रकाशन, अंमळनेर,१९८८, पृ. १०१–१०२



Scanned by CamScanner

ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal

Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

129/498, Vasant Vihar, Near Old Pune Naka, Solapur, MH - 413001
(9637335551 / 7020828552)
www.contemporaryresearchindia.in

ISSN 2231-2137

Scanned by CamScanner